माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वयेदाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१८१३**

**अपिलार्थी श्रीमती शालिनी सतिश शहा**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव**

Pearl of Juhu C.H.S. Ltd, Building no. 7, Flat no. 74, 7th Floor,
Samartha Ramdas Road, J.V.P.D. Scheme, Juhu, Mumbail - 48

**प्रथम अपिलीय अधिकारी**

The Deputy Registrar of Co-operative Societies, (MHADA) Room No.211,
1st Floor, Griha Nirman Bhavan, Bandra (East), Mumbai - 400051

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.१०.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (सुनावणी नोटीस पोस्टाने परत)
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित (सुनावणी नोटीस पोस्टाने परत)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित (सुनावणी नोटीस पोस्टाने परत)

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.०१.२०२३ | - | १७.०३.२०२३ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २३.०४.२०२३ रोजीच्या अर्जान्वये माहिती दिलेली नाही असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. ०६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

अपिलार्थी यांनी दि. ३०.०१.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार Pearl of Juhu Co. Op. Housing Society संबंधीत १४ मुद्यांची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही म्हणून अपिलार्थींनी दि. १७.०३.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २६.११.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission, Greater Mumbai

प्रदीप, cwim 13-10-2025

**मुंबई**
**दिनांक : १३.१०.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१८१३**
**अपिलार्थी श्रीम. शालिनी सतिश शहा**
**सुनावणी दिनांक : २६.११.२०२५ (In continuation of order dt १३.१०.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने सदर कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २५.११.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, या कार्यालयातील उपलब्ध अभिलेखाची पाहणी केली असता, अपिलार्थी यांनी संबंधित माहिती बाबत या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज सादर केल्याचे दिसून येत नाही. तसेच या कार्यालयाकडे प्रथम अपिल सुध्दा दाखल केल्याचे दिसून येत नाही.

३. आयोगासमोरील उपलब्ध अभिलेखावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थींनी त्यांचा माहिती अर्ज एका खाजगी सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे केला होता. साधारणता सहकारी गृहनिर्माण संस्था माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेत येत नाहीत.

४. अपिलार्थी कोणतीही पूर्वसुचना न देता मागील सुनावणीस व आजच्या सुनावणीस अनुपस्थित असल्याने त्यांना माहिती मिळविण्यास स्वारस्य दिसून येत नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

27-11-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २७.११.२०२५**

State Information Commission Greater Mumbai